सत्यमेव जयते
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION
स्वस्य निरभिलाषः खिद्यते लोकहेतोः
मुख्य कार्यालय
बँक ऑफ इंडिया इमारत, ३रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४०० ००१. फोन : ०२२ २२६७ ०२१० / १४८ / २४८ / ३३७ फॅक्स : ०२२ २२६७३९१५
Bank of India Bldg., 3rd Floor, M. G. Road, Hutatma Chowk, Mumbai – 400 001. Tel.: 022-2267 0210 / 148 / 248 / 337 Fax : 022-22673915
माझगांव कार्यालय
विक्रीकर भवन, ९ वा मजला, रुम नंबर ९१५,सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई ४००२०३ ०२२-२३७४२१९१ फॅक्स : ०२२-२३७८१०६१
Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balwantsing Dodhi Marg, Mazgaon,Mumbai-400203 022 - 23742191 FAX : 022-23781061
ई-मेल - sec_mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट - www.mpsc.gov.in

## सहायक/विक्रीकर निरीक्षक (पूर्व)परीक्षा-२००९
**क्रमांक १४४२(२) (१)/२००९/तीन**

**आयोगातर्फे सहायक /विक्रीकर निरीक्षक या पदांसाठी संयुक्त पूर्व परीक्षा-२००९ रविवार दिनांक २० सप्टेंबर, २००९ रोजी घेतली जाईल. या दोन्ही पदांसाठी पात्र असलेले उमेदवार एकच अर्ज भरुन स्पर्धेत भाग घेवू शकतात. या परीक्षेत अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांना सन-२००९ मध्ये होणा-या संयुक्त मुख्य परीक्षेला प्रवेश देण्यात येईल.**

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| अ. क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मातरित | अ. जमात | उन्नत व पगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | वि. मा. प्र. | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | सहायक (एकूण ११०पदे) | ५५ | २० | ५ | ६ | -- | -- | ८ | -- | १६ |
| | महिला - | १६ | ६ | २ | २ | -- | -- | २ | -- | ५ |
| | खेळाडू - | ३ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | अपंग - | १ -अधुदृष्टी (Low vision), १-अस्थिव्यंग(OL,BL), १-अंशत: कर्णबधिर (partialy Deaf) | | | | | | | | |
| २ | विक्रीकर निरीक्षक (एकूण १९० पदे) | ११० | ३३ | ११ | -- | ३ | ४ | १ | २ | २६ |
| | महिला - | ३३ | १० | ३ | -- | १ | १ | -- | १ | ८ |
| | खेळाडू - | ५ | २ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | अपंग - | २ - अल्पदृष्टी (Partialy Sighted), १ - कर्णबधिर (Partialy Deaf), ३ - अस्थिव्यंग (One Leg/Both Leg) | | | | | | | | |

टिप :-**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** महिलांसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**२.३** महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग,क्रमांक ८२/२००१/म.से.आ.२०००/ प्र.क्र.४१५/ का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**२.४** अपंगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**२.५** अपंगासाठी आरक्षित असलेल्या पदावर सरळसेवेने शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता गुणवत्ता क्रमानुसार त्याची शिफारस करण्यात येईल.

**२.६** अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. **तथापि त्यांनी तसे आयोगास स्वतंत्ररित्या पत्राने कळविणे आवश्यक आहे.**

**२.७ खेळाडूंचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.**

**३. वेतनश्रेणी :-** रु. ९३००-३४८००(ग्रेड पे- ४३००) अधिक भत्ते
एकूण वित्तलब्धी अंदाजे रु. १७८९६/-

**४. पात्रतेच्या अटी :-**

**४.१ भारतीय नागरिक**

**४.२ वयोमर्यादा-** दिनांक १ ऑक्टोंबर ,२००९ रोजी किमान १८ वर्षे असावे व ३३ वर्षापेक्षा (मागासवर्गाकरिता ३८ वर्षापेक्षा) जास्त नसावे.

**४.३ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम -**

**४.३.१** महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांकरिता ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम राहील.

**४.३.२** अपंग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षांपर्यंत.

**४.३.३** पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

**४.३.४** सहायक / विक्रीकर निरीक्षक ही पदे शासनाने गट-ब (अराजपत्रित) संवर्गात समाविष्ट केली असल्यामुळे सदर पदांसाठी शासनाने माजी सैनिकांसाठी आरक्षण विहित केलेले नाही. तथापि माजी सैनिकांसाठी उच्च वयोमर्यादा शासकीय आदेशानुसार शिथिलक्षम राहील.

**४.३.४.१ माजी सैनिक/ आणीबाणी व अल्पसेवा राजाधिष्ठ अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षाने शिथिल केली जाईल.**

**४.४ शैक्षणिक अर्हता-**

**४.४.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीच्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

**४.४.२** दोन्ही पदांसाठी मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**४.४.३** जे उमेदवार पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसले आहेत असे उमेदवार सुध्दा या पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु सहायक/विक्रीकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा-२००९ करिता अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांनी सहायक /विक्रीकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा २००९ चा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यन्त पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**४.४.४** ज्या पदवीसाठी अंतर्वासिता (INTERNSHIP) निर्धारित केली असेल अशी पदवी धारण करणा-या उमेदवारांनी अंतर्वासिता मुख्य परीक्षेसाठी अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी पूर्ण केली असेल तरच त्याला पदवीधर समजण्यात येईल.

**५. अपंग आरक्षणाबाबत :-** अपंगांसाठी आरक्षित असलेल्या पदांसाठी खाली नमूद केलेल्या शासन निर्णयांन्वये शारीरिक पात्रतेचे निकष विहित करण्यात आले असून त्यानुसार त्या त्या पदावर उमेदवार गुणवत्तेनुसार पात्र असतील.

**५.१ सहायक :-** १ -अधुदृष्टी (Low vision), १-अस्थिव्यंग(OL, BL), १-अंशत: कर्णबधिर (partialy Deaf शासन निर्णय क्रमांक एएससी -१४०६/प्र.क्र ४७/०६/१४-अ, दिनांक २२ जुलै, २००८.

**५.२ विक्रीकर निरीक्षक :-** अस्थिव्यंग (One Leg/Both Leg Affected) कर्णबधीर (Partialy Deaf) व अल्पदृष्टी (Partialy Sighted) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण -१०.०४/प्र.क्र ७०/२००४/ विक्रीकर (प्रशासन -३), दिनांक २४ नोव्हेंबर, २००४.

**६. अर्ज व माहितीपुस्तिका मिळण्याचे ठिकाण :-**

**६.१** स्पर्धा परीक्षेकरिता आयोगाने विहित केलेल्या नमुन्यातच अर्ज करणे आवश्यक आहे.

**६.२** अर्जासह माहितीपुस्तिका महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हा प्रधान डाकघर व तालुका मुख्यालयाच्या पोस्ट कार्यालयांमध्ये पोस्टाच्या कार्यालयीन वेळेत विक्रीसाठी उपलब्ध आहे.

**६.३** मुंबई तसेच नवी मुंबईच्याबाबतीत अर्जासह माहितीपुस्तिका खालील ठिकाणी कार्यालयीन वेळेत विक्रीसाठी उपलब्ध आहे :-

| **मुंबई** | |
|---|---|
| **काळबादेवी प्रधान डाकघर,** रेशम बाजार लेन, मुंबई- २ | **दादर प्रधान डाकघर,** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, मुंबई- १४ |
| **चिंचबंदर प्रधान डाकघर,** शायदा मार्ग, मस्जीद रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई - ९ | **अंधेरी प्रधान डाकघर,** डी.एन.नगर, अंधेरी, मुंबई- ५३ |
| **चेंबूर प्रधान डाकघर,** टेन्थ रोड, मुंबई- ७१ | **बोरिवली प्रधान डाकघर,** एम.एच.बी.कॉलनी, मुंबई- ९१ |
| **माहिम प्रधान डाकघर,** टी.एच.कटारिया मार्ग,मुंबई- १६ | **मुंबई सेंट्रल प्रधान डाकघर,** डॉ. बेलासिस रोड, मुंबई- ८ |
| **माझगाव डिलिव्हरी पोस्ट ऑफिस,** तळमजला, पोरबंदरवाला अपार्टमेंट, माझगांव, मुंबई- १० | **स्टॉक एक्स्चेंज पोस्ट ऑफिस,** फोर्ट मेन्शन, हमाम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- १ |
| | मुंबई जी.पी.ओ. मुंबई- १ |
| **नवी मुंबई** | |
| **वाशी पोस्ट ऑफीस,** प्लॉट नंबर १८ व १९, सेक्टर-१६ अ, वाशी-४००७०३ | |
| **कोकण भवन पोस्ट ऑफीस,** सिडको भवन समोर, सीबीडी बेलापूर- ४००६१४ | |
| **पनवेल प्रधान डाकघर,** संत साईबाबा स्कूलजवळ, सेक्टर - १९, नवीन पनवेल, ४१०२०६ | |
| **पनवेल शहर पोस्ट ऑफीस,** सीटी पोस्ट ऑफीस, पनवेल-४१०२०६ | |
| **नेरूळ पोस्ट ऑफीस,** सेक्टर-३, बस डेपोजवळ, नेरूळ -४००७०६ | |
| **ओ.एन.जी.सी.पोस्ट ऑफीस,** ओ.एन.जी.सी.कॉम्प्लेक्स-४१०२२१ | |
| **कळंबोली पोस्ट ऑफीस,** कळंबोली नोड, सेक्टर-३-ई-४१०२१८ | |
| **खोपोली पोस्ट ऑफीस,** खोपोली- ४१०२०३ | |

**६.४** अर्जासह माहितीपुस्तिका उपलब्ध असलेल्या पोस्ट कार्यालयांची यादी आयोगाच्या वेबसाईटवर (www.mpsc.gov.in) उपलब्ध आहे.

**६.५** अर्जासह माहितीपुस्तिकेची किंमत रुपये १००/- इतकी आहे.

**६.६** प्रस्तुत परीक्षेस अर्ज करण्यासाठी "स्पर्धा परीक्षेकरिता अर्ज व माहितीपुस्तिका" असे नमूद केलेली (फिक्कट निळया रंगाची) माहितीपुस्तिकाच विकत घ्यावी असे उमेदवारांना सूचित करण्यात येत आहे.

**६.७** अर्ज एकदाच व फक्त एकाच परीक्षेसाठी वापरता येईल.

**६.८** अर्जासह माहितीपुस्तिकेच्या विक्रीची व्यवस्था फक्त निवडक पोस्ट कार्यालयांतच करण्यात आली आहे. आयोगाच्या कार्यालयात अर्जाच्या विक्रीची कोणतीही व्यवस्था करण्यात आलेली नाही. तसेच, अर्ज मागविण्याकरिता पत्राद्वारे विनंती केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

**६.९** अर्जासह माहितीपुस्तिकेच्या उपलब्धतेबाबत कोणतीही अडचण उद्भवल्यास उमेदवारांनी संबंधित पोस्ट मास्टर अथवा आयोगाच्या कार्यालयांशी वर नमूद केलेल्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

**६.१०** पूर्वीच्या अर्जातील "Do you claim reservation ?" या रकान्याबाबत उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी विचारात घेवून आयोगाने या परीक्षेपासून पुढील सर्व परीक्षांकरीता सदर रकाना स्पर्धा परीक्षेच्या अर्जातून वगळण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच माहितीपुस्तिका व अर्जात इतरही काही अनुषंगिक बदल करण्यात आले आहेत. स्पर्धा परीक्षेची सुधारित माहितीपुस्तिका व अर्ज विहित पोस्ट कार्यालयात विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. त्याचप्रम ाणे आयोगाकडे शिल्लक असलेल्या पूर्वीच्या जुन्य ा माहितीपुस्तिका व अर्जही पोस्ट कार्यालयात विक्रीसाठी आहेत. या परिस्थितीत उमेदवाराने जुना अथवा नवीन कोणताही अर्ज भरुन सादर केल्यास तो आयोगाकडून ग्राह्य धरला जाईल, याची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

**७. शुल्क :-**

**७.१** अमागास - रुपये २५०/-

**७.२** मागासवर्गीय - रूपये १२५/-

**७.३** परीक्षा शुल्क टपाल कार्यालयात आवेदनपत्रासोबत रोखीने भरणे आवश्यक आहे.

**८. अर्ज सादर करण्याचे ठिकाण व अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक :-**

**८.१** संपूर्ण भरलेला अर्ज **(अर्जासोबत कोणतीही मुळ प्रमाणपत्रे किंवा त्यांच्या प्रती जोडू नयेत.)** परीक्षा शुल्कासह माहितीपुस्तिकेमध्ये नमूद केलेल्या राज्यातील सर्व जिल्हा, प्रधान डाकघर व तालुका मुख्यालयाच्या पोस्ट कार्यालयांपैकी कोणत्याही ठिकाणी कार्यालयीन वेळेत **दिनांक २९ जुलै, २००९** पर्यंत स्वीकारण्यात येईल.

**८.२** संपूर्ण भरलेला अर्ज व परीक्षा शुल्क फक्त पोस्ट कार्यालयामार्फतच विहित कालावधित स्वीकारण्यात येईल. आयोगाच्या कार्यालयात कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्वीकारला जाणार नाही. अथवा त्यासंदर्भातील चौकशीची दखल घेतली जाणार नाही.

**९.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. आवश्यक अर्हता, पदांबाबतची इतर माहिती, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, आरक्षण, निवडीचे सर्वसाधारण स्वरुप, प्रमाणपत्रांचे नमूने, परीक्षा केंद्र इत्यादी माहितीकरिता अर्जासोबत पुरविण्यात येणा-या माहितीपुस्तिकेचे कृपया अवलोकन करावे.

**१०.** पोलीस उपनिरीक्षक पदाच्या भरतीसाठी स्वतंत्र परीक्षा घेण्यात येणार असून त्यासाठी स्वतंत्र जाहिरात लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

**प्र. ई. धबाले**
उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुंबई :
दिनांक : ३० जून, २००९